# आता आणखी विलंब नको

'मेट्रो-३' सुरू झाल्यास पश्चिम द्रुतगती मार्गावरील वाहतूक कमी होण्याची अपेक्षा आहे. ही मार्गिका पश्चिम, हार्बर रेल्वेसाठी एक सक्षम पर्याय असेल. मुंबईला थेट उत्तरेकडून दक्षिणेशी जोडली जाईल. सध्याच्या रेल्वेपासून काहीशा बाजूला सरलेल्या वांद्रे-कुर्ला संकुलाशी संलग्नता वाढविणारी ही मार्गिका असेल. आरे, सीप्झ, अंधेरी भागात येणाऱ्या लाखो नोकरदारांसाठी ही मार्गिका दिलासादायी असेल. वाहतूककोंडीला त्रासलेला मुंबईकर या ३३ किमी लांब मेट्रो मार्गिकेची चातकाप्रमाणे प्रतीक्षा करीत आहे. पहिल्या टप्प्यासाठी डिसेंबरचा मुहूर्त निश्चित केला असताना आता त्यात आणखी विलंब नको, अशी अपेक्षा आहे. अशा स्थितीत कामे निम्मीच होणे चिंताजनक आहे. ती वेळेत पूर्ण होऊन डिसेंबरच्याआधीच पहिला टप्पा कार्यान्वित व्हावा.